ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख १६ एप्रिल, १९५२ अंक १६

## विविध माहिती

**चहाच्या मळ्याची विक्री**— दार्जिलिंग जिल्ह्यांतील तीन चहाच्या मळ्यांवर प. बंगाल सरकारनें पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टप्रमाणें नोटिसा बजावल्या आहेत. ह्या मळ्यांतील कामगारांनीं आपला पगार न मिळाल्याबद्दल कोर्टांत फिर्याद दाखल केली आहे. कामगारांचा पगार मिळावा म्हणून ही दक्षता घेण्यांत आली आहे.

**हैद्राबाद राज्यांतील पडीक जमीन**— हैद्राबाद राज्यांत लागवडीला आणण्यासारखी ३० लाख एकर जमीन पडीक आहे, असें समजतें. त्यापैकीं ३६ हजार एकर पडीक जमीन शेतीखालीं आणण्यांत आली आहे. सध्यां राज्यांत ५० यंत्रचलित नांगर पडीक जमीन नांगरण्याचें काम करीत आहेत.

**भारतासाठीं अमेरिकन तज्ज्ञ**— भारत सरकारच्या ट्यूब विहिरी खोदण्याच्या कार्यक्रमास मदत करण्यासाठीं मि. डेव्हिड स्टोनर नांवाचे एक तज्ज्ञ भारतांत आले आहेत. मि. स्टोनर हे पाटबंधाऱ्याचे तज्ज्ञ असून त्यांची मदत अमेरिका व भारत ह्यांच्या दरम्यान झालेल्या तांत्रिक सहाय्याच्या कराराप्रमाणें होणार आहे.

**इराणचे तेलाचे सौदे**— इराण सरकारच्या तेल कमिशननें डेन्मार्क, नॉर्वे आणि फिन्लंड ह्या देशांना २९,००,००० टन क्रूड ऑईल विकत देण्याचे करार केले आहेत. खरेदी करणारे देश स्पेनच्या तेलवाहू जहाजांतून तेल इटलीला नेतील आणि तेथें तें शुद्ध करतील.

**दिल्लींतील राजनैतिक वसाहत**— नव्या दिल्लींत आपआपल्या स्वतंत्र इमारती बांधण्यासाठीं सुमारें २० राष्ट्रें भारत सरकारशीं जागा विकत घेण्याबद्दल वाटाघाटी करीत आहेत. ब्रिटन, ऑस्ट्रेलिआ व जपान ह्या राष्ट्रांनीं तर आपल्या जागेच्या किंमतीहि चुकत्या केल्या आहेत. ब्रिटनची जागा २४·७१ एकर, ऑस्ट्रेलिआची ११·८८ एकर आणि जपानची ५·७९ एकर आहे.

**डी. डी. टी. चा कारखाना दिल्लीला**—दरवर्षी ७५० टन डी. डी. टी. तयार करणारा एक कारखाना मुंबईला काढण्यांत यावयाचा होता. परंतु आतां तो दिल्लीला काढण्यांत येणार असल्याचें समजतें. कारखाना काढण्याच्या कामीं जागतिक आरोग्य संघटनेची अंशतः मदत होणार आहे. कारखान्याचें चालकत्व एका खाजगी कंपनीकडे देण्यांत येणार आहे. बहुतेक संचालक सरकार नेमणार आहे.

**ओपेल कारखान्याचे जप्त शेअर्स**— गेल्या महायुद्धांत जर्मन कारखानदारांचें परदेशांतील भांडवल निरनिराळ्या देशांनीं आपल्या ताब्यांत घेतलें होतें. हारवर्ड ब्रुइंग ह्या अमेरिकन कंपनीला जर्मनीच्या ओपेल कारखान्याचे ३,७०,००० डॉलर्सचे भाग देण्यांत आले होते. वॉशिंग्टन येथील सुप्रीम कोर्टानें हे भाग आतां ओपेल कंपनीला परत घेण्याची परवानगी दिली आहे.

**इंडिअन इंस्टिटयूट ऑफ सायन्स**—ह्या संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलची बैठक नुकतीच झाली, तींत १९५१-५२ सालचें अंदाजपत्रक मंजूर करण्यांत आलें. नित्याचा खर्च म्हणून २३,७५,००० रुपये आणि भांडवली खर्च म्हणून १६,६८,००० रुपये मंजूर करण्यांत आले. टाटांकडून मिळालेल्या ३,००,००० रुपयांच्या देणगीबद्दल आभारप्रदर्शक ठरावहि करण्यांत आला.

**कॉलेज विद्यार्थ्यांचा नौकरीसाठीं शोध**—उत्तरप्रदेश राज्यांतील उद्योग-विनिमय-केंद्रांत नौकरी मागणाऱ्या कॉलेजमधील विद्यार्थ्यांची संख्या वाढूं लागली आहे. कांहीं दिवसांपूर्वीं फक्त ५ विद्यार्थ्यांनीं आपलीं नांवें नोंदविलीं होतीं. आतां त्यांची संख्या ५० झाली आहे. चपराशी, रेल्वेंत वॉच अँड वॉर्ड, अशा मिळतील त्या नौकऱ्या करण्यास ते तयार आहेत.

**दुधाच्या भुकटीची देणगी**—रायलसीमा भागांतील दुष्काळपीडितांना देण्यासाठीं डेनमार्ककडून ६ टन दुधाची भुकटी भारत सेवक समाजाकडे पाठविण्यांत आली आहे. दुष्काळग्रस्तांना मदतकेंद्रांतून दूध, गूळ आणि एक प्रकारची लापशी देण्यांत येत असते.

**काळपुळीचे बळी**— इंडियन कॅन्सर सोसायटीचे विभागीय अध्यक्ष, डॉ. मित्र ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, जगांत दररोज सुमारें २,००० माणसें काळपुळीच्या रोगानें दगावतात. ह्या रोगाचा उद्भव आणि प्रतिकार ह्यासंबंधीं कितीतरी माहिती उपलब्ध आहे. परंतु तिचा प्रसार करण्याचीं पुरेशीं साधनें कांहीं भागांत नाहींत. माहितीच्या प्रसाराबाबत अधिक आंतराष्ट्रीय सहकार्य आवश्यक आहे.

**पोलंडला रशिआची देणगी**— रशिआ पोलंडला आपल्या खर्चानें 'शास्त्र आणि संस्कृति प्रासाद' ह्या नांवाची एक ३० मजली गगनचुंबी इमारत बांधून देणार असल्याचें समजतें. ही इमारत वॉरसा शहराच्या मोठ्यांत मोठ्या चौकांत बांधण्यांत येणार आहे. बांधकाम सोव्हिएट इंजिनिअर्स व कामगार करणार आहेत.

## नागपुरांत "सहकारी सदना" चें उद्घाटन

### मध्यप्रदेश को. बँकेच्या कामगिरीचा गौरव

मध्यप्रदेश को. बँकेच्या नागपूर येथील टिळक पुतळ्याजवळील 'सहकारी सदन' ह्या नवीन इमारतीचें उद्घाटन फायनान्स कमिशनचे एक सदस्य व मुंबई राज्याचे माजी अर्थ-सहकार मंत्रि, श्री. वैकुंठराय मेहता, ह्यांनीं ता. ८ एप्रल रोजीं केलें. राज्यपाल ना. पक्वासा व बँकेच्या मॅनेजिंग कमिटीचे अध्यक्ष श्री. माधवराव देशपांडे ह्यांच्या भाषणानंतर रजिस्ट्रार श्री. मुख्त्यार ह्यांनीं सहकारी चळवळीचा आढावा घेतल्यावर श्री. मेहता ह्यांचें भाषण झालें. "रजिस्ट्रार येतील आणि जातील पण श्री माधवराव देशपांडे मात्र संस्थेचा त्याग करून कधींहि जाणार नाहींत" असा त्यांचा दीर्घ सेवेचा गौरवपूर्वक उल्लेख त्यांनीं केला.

### श्री. वैकुंठराय मेहता यांचें भाषण

आपल्या भाषणांत श्री. मेहता पुढें म्हणाले, "प्रांतांच्या आर्थिक विकासाच्या आणि उन्नतीच्या कार्यांत इतकी महत्त्वाची भूमिका वठविणाऱ्या ह्या संस्थेच्या इमारतीचें उद्घाटन करण्यांत मला अतिशय आनंद होत आहे. सामान्यतः तुलना करणें टाळावें, असा संकेत आहे. परंतु मला असें सांगितल्यावांचून राहावत नाहीं कीं देशांतील सहकारी बँकांमध्यें काम, व्याप आणि महत्त्व या दृष्टीनें ह्या बँकेचा तिसरा नंबर लागतो. ह्या बँकेची व्यवस्था आणि तिच्यातर्फे करण्यांत येणाऱ्या कामाचा दर्जा उच्च आहे. हें पाहून मला फार संतोष होतो, आणि त्यावद्दल मी चालकांचें अभिनंदन करतों.

"पूर्वी सहकारी तत्त्वाचा अवलंब बँकांच्या कामांत करण्यांत येऊं नये, असें मत प्रचलित होतें. आतां अमेरिकेंत देखील जनमत बदललें आहे व वाढत्या प्रमाणावर सहकारी बँका निर्माण होऊं लागल्या आहेत. अशा बँकांचा एक विशेष हा कीं त्यांच्या कार्यामुळें उत्पादक आणि ग्राहक ह्या दोघांच्याहि हिताचें रक्षण होतें. म. प्र. को. बँकेनें, सहकारी शेतीचें जें नवीन कार्यक्षेत्र निर्माण झालें आहे, त्यांत प्रवेश करून आणखी एक विक्रम करून दाखवावा."

### कुपवाड वि. का. सहकारी सोसायटी

सोसायटीचा रौप्य ज्युबिली समारंभ ता. ८।४।५२ रोजीं मंगळवारीं सकाळीं ९ वाजतां साजरा झाला. नियोजित अध्यक्ष आमदार एस्. डी. पाटील, बी. ए., एलएल्. बी. हे कांहीं अडचणींच्या कामामुळें येऊं शकले नाहींत. म्हणून आमदार जी. डी. पाटील, बॅरिस्टर, यांचे अध्यक्षतेखालीं सदर समारंभ साजरा केला. प्रास्ताविक भाषण चेअरमन श्री. आर. पी. पाटील व नाण्याच्या धडामोडींबद्दल सेक्रेटरी श्री. आणा नेमाणा कोथळे यांचें वाचन फार चांगलें झालें. नंतर सहकारी तत्त्वावर श्री. दप्तरदार सांगली व १०५ क्षुल्लक सुरिसिंहजी महाराज यांचें फारच चांगलें भाषण झालें. अध्यक्षांचें समारोपपर भाषण झालें.

### जपानी तंत्रज्ञांची भरती

भारतीय व्यापारी फर्म आणि औद्योगिक कंपन्या यांचेकडून जपानी तंत्रज्ञ आणि तज्ज्ञ यांची होणारी भरतीची प्रचलित पद्धति बंद करण्याबाबत भारत सरकार गेला कांहीं काळ विचार करीत होतें. आतांपर्यंत जपानमधील दोस्तांच्या वरिष्ठ सरसेनापतींनीं ठरविलेल्या नियमांनुसार औद्योगिक संस्थांकडून जपानी तंत्रज्ञांची भरती करण्यांत येत असे आणि त्याबाबत होणाऱ्या करारांस जपानी सरकारकडून मान्यता मिळवावी लागे आणि उपरोक्त सरसेनापतींकडून त्यास होकार घ्यावा लागे. अशा प्रकारच्या कोणत्याहि करारांत भारत सरकारचा संबंध नव्हता, तरी परकीय हुंडणावळीचा खर्च योग्य होता व राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें जपानी तज्ज्ञाची भरती झाली असल्याबद्दल खात्री करून घेतल्यावर प्रत्येक प्रकरणास सरकारला मान्यता द्यावी लागत असे. व्यापारी कंपन्यांनीं जपानी तंत्रज्ञांशीं थेट करार करण्यास परवानगी देण्याचा आतां निर्णय घेण्यांत आला आहे. यापुढें अशा करारांस दोस्तांच्या वरिष्ठ सेनाधिकाऱ्याच्या परवानगीची जरुरी नाहीं. परंतु अशा लोकांच्या वेतनाची किंवा त्यांपैकीं अंशात्मक भागाची रक्कम जपानला पाठविण्याकरतां रिझर्व्ह बँकेची तयारी आहे किंवा नाहीं याची खात्री करून घेण्यासाठी मालकांनीं त्या बँकेकडे प्रथम अर्ज करून विचारणा करावी. ही गोष्ट न केल्यास अशा रकमा देण्याबद्दल परवानगी देणें अडचणीचें आहे असें रिझर्व्ह बँकेस मागाहून दिसल्यास तंत्रज्ञांना बरीच गैरसोय सोसावी लागेल भारतांत येण्याचा परवाना मिळाल्यानें भारताबाहेरील देशांत रुपयांत मिळालेलें वेतन पाठविण्याची तंत्रज्ञांना परवानगी आहे, असें नाहीं.

### हिंद फिनॅन्स, इंडस्ट्रीज अँड इन्व्हेस्टमेंट लि.

नागपूर येथील वरील कंपनीच्या, ३१ मार्च १९५२ अखेरच्या ट्रायल बॅलन्सशीटवरून तिनें केलेल्या प्रगतीची कल्पना येते. कंपनीचें वसूल भांडवल ३४,९२५ रु. झालें असुन ठेवींची रक्कम ८७,८१० रु. झाली आहे. 'हिंदफिन' चे मॅनेजिंग एजंट भोंसुले, श्रौति आणि कंपनी, ह्यांनीं कंपनीच्या प्रगतिसाठी अविश्रांत श्रम चालविले आहेत आणि आस्थेवाईक नागरिकांचें उत्कृष्ट सहकार्य मिळविलें आहे. मध्यम वर्गाच्या बिकट परिस्थितीमुळें, सहानुभूतीचें प्रकट स्वरूपांत रूपांतर होणें कठीण झालें, तरी मॅनेजिंग एजंटांनीं कांहीं काळ ऑफिस अलावन्स न घेतांहि कंपनीचा पाया भक्कम करण्याचें ठरविलें आहे. कंपनीनें ९६,२९३ रु. चीं कर्जें देऊन व २१,८१८ रु रोख बाळगूनहि सुमारें ६ हजार रुपयांचें उत्पन्न मिळविलें. निव्वळ नफा सुमारें ६०० रु. राहील, अशी अपेक्षा आहे. मॅनेजिंग एजंटांना येत्या तीन महिन्यांत भांडवल आणखी मिळूं शकेल, तर डिव्हिडंड वाटतां येईल असा विश्वास वाटतो. श्री. भोंसुले ह्यांच्यासारख्या अनुभवी व तज्ज्ञ गृहस्थांच्या व्यवस्थेखालीं अधिक पैसा गुंतवितां येऊं शकला, तर त्याचें चीज होईल अशी परिस्थिति आहे. "हिंदफिन" ची भरभराट होवो, असें आम्हीं चिंतितों.

### शेतकी विद्यार्थ्यांसाठी वासंतिक वर्ग

एस्. एस्. सी. परीक्षेस बसलेल्या व शेती-महाविद्यालयांत प्रवेश घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या शेतीविभागातर्फे एक "वासन्तिक" वर्ग चालविण्यांत येणार आहे. हा वर्ग शेतकी कॉलेजांतील शिक्षणासंबंधीं सर्वांगीण परिचय कॉलेजांत प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांस व्हावा, या हेतूनें सुरू करण्यांत येणार आहे. तेव्हां शेतकी कॉलेजांत प्रवेश घेऊं इच्छिणाऱ्या सर्व एस्. एस्. सी. परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांनीं आपलीं नांवें नोंदवावीं अशी त्यांस विनंती आहे. वर्ग ता. १ मे, १९५२ ते ता. ३१ मे, १९५२ पर्यंत चालेल. अधिक माहिती वरील संग्रहालयांत मिळेल. नांवें नोंदविण्याचें ठिकाण व पत्ता "क्यूरेटर, लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें २," असा आहे, असें क्यूरेटर व सेक्रेटरी, श्री. भा. वि. धारपुरे हे कळवितात.

# अर्थ

बुधवार, ता. १६ एप्रिल, १९५२



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## श्री. देशमुख यांचें इंडियन मर्चंटस् चेंबरपुढील भाषण

इंडियन मर्चंट्स् चेंबरच्या वार्षिक अधिवेशनाचें उद्घाटन करतांना अर्थमंत्रि श्री. देशमुख आजच्या औद्योगिक व मंदीच्या परिस्थितीबद्दल म्हणाले कीं, उत्पादन व रोजगारी यांवर अनिष्ट परिणाम होणार नाहीं याबद्दल दक्षता बाळगली पाहिजे. इतक्यांतच उद्योगधंद्यांना विशेष रीतीनें मदत करण्याची वेळ प्राप्त झालेली नाहीं. देशाच्या गरजा लक्षांत घेतांना व कर्ज उभारण्याची परिस्थिति विचारांत घेतां आज करांचें मान वाजवीपेक्षां जास्त नाहीं. आजच्या मंदीचा विचार केवळ तात्त्विकदृष्ट्या करण्यांत अर्थ नाहीं. गेल्या तीन वर्षांत भांडवलदारांना सवलती दिल्या असतांहि, विकास योजनांसाठी सरकारला भांडवल उभारतां आलें नाहीं. यामुळें जादा पैसा करयोजनांपासून वसूल करावा लागला. करांचें दडपण योग्य प्रमाणांत असेपर्यंत विकास योजनांचा खर्च चालू जमेच्या साधनांतून करावयास कांहींच हरकत नाहीं. जमाखर्चांत शिल्लक उरली तर त्यामुळें सरकारी खर्चांत काटकसर करण्याकडे दृष्टि राहणार नाहीं हें म्हणणें निरर्थक आहे; कारण, जी कांहीं शिल्लक राहील तिचा उपयोग भांडवली खर्चाकडे केला जात आहे. उद्योगधंद्यांना करविषयक सवलती देण्यासाठीं सरकारी खर्चांत काटकसर केली जावी ही विचारसरणी चुकीची आहे. करपद्धतीच्या बाबतींत मात्र नवीन अधिकारारूढ होणारें सरकार चौकशी कमिटी नेमील. आजची मंदी ही वास्तविक १९५० चें कोरियन प्रकरण उद्भवलें नसतें तर त्याचवेळीं सुरू झाली असती. आतां उतरणाऱ्या किंमतीशीं समरस होणें व्यापारी व कारखानदार वर्गाला कठीण जात असलें तरी या परिस्थितीला हळूहळू तोंड देण्याची त्यांनीं तयारी ठेविली पाहिजे. परराष्ट्रीय व्यापारी हिशेबांत समतोलपणा निर्माण करण्यासाठीं सरकारनें कांहीं निर्गत जकाती रद्द केल्या व निर्गतीवरील बंधनें ढिलीं केलीं. हा केवळ आजच्या मंदीच्या काळांत सहजरीत्या घडून आलेला योगायोग आहे. उद्योगधंदे व व्यापार यांना जरूरीप्रमाणें योग्य प्रमाणांत कर्ज देण्यांत यावीं याबद्दल रिझर्व्ह बँकेला सूचना दिल्या जात आहेत, व तदनुसार बँकांकडून मिळणाऱ्या कर्जाचें धोरण आंखण्यांत येत आहे. उत्पादनाच्या योजनांसाठीं सरकारला पैसा आवश्यक असल्यामुळें धान्यावरील सबसिडी बंद करावी लागली आहे व पंचवार्षिक योजनेनेंहि धान्योत्पादनावर यासाठींच जास्त भर दिला असून, उद्योगधंद्यांना दुय्यम स्थान दिलें आहे. देशांत स्थापन झालेल्या उद्योगधंद्यांना विघातक होत नसेल किंवा देशाच्या आर्थिक परिस्थितीच्या आड येत नसल तर सध्यांच्या परिस्थितींत परकी भांडवलाला समान भूमिकेवर प्रवेश द्यावयास कांहींच हरकत नाहीं. विक्री-करांत एकसूत्रीपणा राखणें आवश्यक असलें तरी निरनिराळीं राज्य सरकारें आज या गोष्टीला तयार होणार नाहींत; तेव्हां या प्रश्नाच्या विचाराला आजचा काळ योग्य नव्हे. मध्यवर्ती सरकार, राज्य सरकारें व खाजगी भांडवलदार यापैकीं कोणीहि हातीं घेतलेल्या औद्योगिक उत्पादनाच्या गोष्टींवर एकाच प्रकारें कर आकारला जातो. फक्त सार्वजनिक उपयुक्ततेच्या दृष्टीनें हातीं घेतलेल्या गोष्टींचा, निराळ्या प्रकारें, करांचे बाबतींत विचार केला जातो. उदाहरणार्थ, सिंद्री फर्टिलायझर फॅक्टरीला प्राप्तीवरील कर भरावा लागतो. मजुरांच्या हितासाठी कारखानदारांना करावा लागणारा खर्च मानवेल व वाढवितांहि येईल असाच आहे. असें श्री. देशमुख ह्यांनीं सांगितलें.

## बँक ऑफ पूना लि.

बँक ऑफ पूना लि. नें १९५१ सालीं १,५४,२०७ रु. व्याज, कमिशन इ. चें उत्पन्न मिळविलें आणि दिलेलें व्याज, व्यवस्थाखर्च, इत्यादि सर्व खर्च भागविल्यानंतर १८,५६८ रु. निव्वळ नफा उरला. त्यांत शिलकी नफा मिळविल्यावर नफावाटणीस १९,४६९ रु. येतात. ५,००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून आणि ८,००० रु. ची इनकमटॅक्सची तरतूद करून ६,४६९ रु. नफा पुढील वर्षांत ओढावा अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. प्राथमिक खर्च व शेअर्स विक्रीवरील ब्रोकरेज, ह्यांची बाकी ताळेबंदांतील जिंदगीच्या बाजूस आतां पूज्य करण्यांत आली आहे. बँकेचें अल्प व्याजानेंच ठेवी घेण्याचें धोरण योग्य असून १२,५०,००० रु. चें शेअर भांडवल २४,६१,८६८ रु. च्या ठेवींच्या पाठीशीं आहे. त्यामुळें आणि रोख, बँकांत व रोख्यांत बँकेची १३½ लक्ष रुपयांवर रक्कम तरती असल्यामुळें ठेवीदारांच्या हिताची पूर्णपणें जपणूक झालेली आहे. सरकारी रोख्यांचे बाजारभाव घटले, ही परिस्थिति सर्वच बँकांस सारखीच लागू आहे आणि पूना बँकेजवळील रोखे दर्शनी किंमतीपेक्षां कमी किंमतीस खरीदलेले असल्यामुळें, त्यांची पूर्ण दर्शनी किंमत ठराविक वेळीं बँकेस मिळणार आहे. बँकेजवळील ठेवींची रक्कम गेल्या वर्षीप्रमाणेंच राहिली आहे, ही गोष्ट उल्लेखनीय आहे. बँकेच्या पुणें शहरांत मुख्य कचेरीखेरीज दोन व सोलापूर आणि सांगली येथें शाखा आहेत. ( चेअरमन : शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया. व्हाइस चेअरमन: शेठ दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी. मॅनेजर: गोविंद गंगाधर साठे, ए. बी. आय, लंडन. )

## मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचा शिक्षण फंड

सहकारी कायद्याचें कलम ३९ व कानू २६ अन्वयें ज्या सहकारी मंडळ्या आपल्या सभासदांना भागांवर नफा वांटतात, त्यांनीं 'मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट शिक्षण फंड' नफा वाटणीचे वेळीं काढावयाचा असतो. अनेक सहकारी मंडळ्या असा फंड काढून इन्स्टिट्यूटकडे पाठवीत नाहींत असें निदर्शनास आल्यावरून रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज्, पुणें यांनीं सरक्युलर काढून, असा फंड सदर संस्थेकडे शक्य तितक्या लवकर पाठविण्याबद्दल कळविलें आहे. तसें न घडल्यास सहकारी कायदा कलम ६० प्रमाणें तो गुन्हा घडेल.

## वेस्टर्न इंडियाची अखंड प्रगति

सातारा येथील सुप्रसिद्ध वेस्टर्न इंडिया विमा कंपनीच्या ११ व्या मूल्यमापनाचा अहवाल नुकताच हातीं आला आहे. सदरचें मूल्यमापन १९५० साल अखेर पुऱ्या होणाऱ्या त्रैवार्षिक मुदतीचें असून कंपनीचे ॲक्च्युअरी व मॅनेजर श्री.के.वाय. जोशी, बी.ए., एफ. आय. ए., यांनीं तें केलेलें आहे. १९४८–१९५० ह्या तीन वर्षांच्या चोख कारभाराचें प्रत्यंतर म्हणजे कंपनीनें विमेदारांस त्रैवार्षिक नफा, हयातींतील पॉलिसींवर हजारी रु. २७ व हयाती नंतरचे पॉलिसींवर हजारी रु. ३३ याप्रमाणें वांटला. चालू आर्थिक परिस्थितींत १९५० अखेरच्या मूल्यमापनांत प्रस्तुत विमा कंपनीनें विमेदारांना वाटलेला हा नफा निःसंशय प्रशंसनीय आहे. इतर प्रथितयश कंपन्यांनीं या प्रमाणांत विमेदारांना नफा वाटल्याचें क्वचित दिसून येतें. मूल्यमापनांत व्याजाचा दर फक्त २·८७५ असा गृहीत धरला असला तरी कंपनीस ह्या तीन वर्षांत प्रत्यक्ष पडलेल्या निव्वळ सरासरी व्याजाचें प्रमाण ३·५४ असें आहे. कंपनीस पडलेला निव्वळ व्याजाचा दर व बाजारांतील व्याजाचे वाढते दर लक्षांत घेतां कडक कसोटी लावूनच मूल्यमापन केलें असल्याचें लक्षांत येईल.

ह्या मूल्यमापनांत एकंदर २८,२९,२७७ रु. इतका फायदा झाला असून त्यांतील ९५ टक्के रक्कम विमेदारांस वाटली असून भागीदारांस ५ टक्के नफा वाटला आहे. कंपनीचा कारभार अत्यंत काटकसरीचा असून खर्चाचें प्रमाण मूल्यमापनांत धरलेल्या पेक्षां पुष्कळच कमी म्हणजे फक्त ११ ते १२ टक्क्यांच्या दरम्यान आहे.

कंपनीच्या चालू कामांत मूल्यमापनाचे कालखंडात ११⅓ कोटी रु. वरून १५⅔ कोटी रु. म्हणजे ४⅓ कोटींची वाढ झाली आहे. १९५१ सालांतहि दोन कोटी, पासष्ट लाखांवर नवीन काम पूर्ण करून कंपनीनें परंपरा कायम राखली आहे. तसेच, विमेदारांचे क्लेम्स देण्यातहि कंपनीनें आतांपावेतों रु. १७९ लाखांवर रुपयांचे क्लेम्स देऊन तत्परता दाखविली असून विमेदारांचा विश्वास संपादन केला आहे.

वेस्टर्न इंडियाचा लौकिक हा भक्कम आर्थिक परिस्थिति, सावधगिरीचा व काटकसरीचा कारभार व विमेदारांच्या हितास प्राधान्य ह्यांवर आधारलेला असल्यानें, १९५० च्या अखेरच्या मूल्यमापनानें त्यांत आणखी भरच घातली आहे. त्यामुळें, कोणत्याहि परिस्थितींत वेस्टर्न इंडियाच्या विमेदारांस योग्य संरक्षण मिळण्याची निश्चिति प्राप्त झाली आहे. वेस्टर्न इंडियानें हिंदी आयुर्विमा संस्थांतील उच्च स्थान केवळ गुणांवर मिळविलेलें आहे. तिचा कारभार विमेदारांचे ट्रस्टी ह्या भूमिकेवरून कार्यक्षमतेनें चालविण्यांत येत असतो. अशी संस्था नमुनेदारपणें चालविल्याबद्दल तिच्या चालकांचें आम्हीं अभिनंदन करतों.

---

**उर्दू पुस्तकाला बक्षीस**— हिंदुस्थानी वाङ्मयाला उत्तेजन देणारी हिंदुस्थानी ॲकॅडमी नांवाची एक सरकार–पुरस्कृत संस्था संयुक्त–प्रदेशांत आहे. ह्या संस्थेनें 'अजश-स-एज' ह्या नांवाच्या उर्दू कादंबरीला ५०० रुपयांचें पारितोषिक देण्याचें ठरविलें आहे. ह्या कादंबरीचे लेखक श्री. किशन चंदर हे मुंबईचे आहेत. १९४५ ते १९४९ ह्या काळांतील सर्वांत उत्तम उर्दू कादंबरी, म्हणून हें बक्षीस देण्यांत आलें आहे.

## ब्रिटन–चीन व्यापारी करार


मॉस्को येथें भरलेल्या आर्थिक परिषदेंत प्रत्यक्ष कार्य काय होणार ह्यासंबंधीं बरेच तर्क–वितर्क करण्यांत येत होते. जागतिक अर्थ–व्यवस्थेचा नुसता तात्त्विक विचारच परिषदेंत झाला असता, तर त्याला फारसें महत्त्व प्राप्त झालें नसतें. परंतु परिषदेंत तात्त्विक विचारांच्या देवाण–घेवाणीशिवाय व्यावहारिक कार्य होईल असें दिसतें. परिषदेला आलेल्या ब्रिटिश आणि चिनी प्रतिनिधी–मंडळांनीं एक व्यापारी करार केला आहे. ह्या कराराप्रमाणें चालू वर्षअखेरपर्यंत उभयता देशांत एक कोटी पौंड किंमतीच्या मालाचा व्यापार होणार आहे. ब्रिटनकडून चीनला कापड, रसायनें आणि तांबें व अल्युमिनम सोडून इतर धातू पुरवण्यांत येणार आहेत. तांबें आणि अल्युमिनम हे दोन धातू युद्धोपयोगी असल्यानें आणि चिनी स्वयंसेवक सध्यां कोरिआच्या युद्धांत भाग घेत असल्यामुळें, ते चीनला पुरविल्यास अमेरिका रुष्ट होईल हें उघडच आहे. उलटपक्षीं, चीन ब्रिटनला कोळसा, गोठलेलीं अंडीं, आणि इतर अन्नपदार्थ पुरवेणार आहे. ब्रिटनचें कोळशाचें उत्पादन पुरेसें होत नसल्यामुळें मिळेल तेथून कोळसा घेण्याचें ब्रिटनचें धोरण दिसतें. अन्नपदार्थांच्या बाबतींतील ब्रिटनची हलाखी चालूच आहे. मास्कोला आलेलें ब्रिटिश प्रतिनिधीमंडळ पूर्णपणें खाजगी आहे. म्हणजे, ब्रिटिश सरकारनें अधिकृतपणें वरील करार केलेला नाहीं. तरी पण, राजकारणांतील अस्वस्थता आर्थिक व्यवहारांच्या आड येण्याचें कारण नसतें, हें वरील करारावरून दिसून येतें. चीनला पाठवावयाच्या मालासाठी ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेड कडून खाजगी निर्यात संस्थेला परवाना घ्यावा लागतो. त्याचप्रमाणें कोळसा आणि अन्नपदार्थ ह्यांची खरेदी ब्रिटिश सरकारच करीत असते, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

---

## मद्रास राज्यांतील मधमाशा पाळण्याचा धंदा


मद्रास सरकारच्या ग्रामीण–विकास–खात्यानें राज्यांतील ८४ ग्रामोद्योग केंद्रांतून मधमाशा पाळण्याच्या धंद्याला उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. मद्रास सरकार स्वतः हा धंदा करीत नाहीं. ह्या कामासाठी प्रात्यक्षिकें करून दाखविणारे कांहीं पगारी नौकर नेमण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ग्रामोद्योग केंद्रांत जाऊन शेतकऱ्यांना मधमाशा पाळण्याचें प्रात्यक्षिक दाखविणें हें काम वरील नौकर करणार आहेत. अशा रीतीनें शेतकऱ्यांकडून मधाचें उत्पादन अधिक होण्यास मदत होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. सरकारच्या संशोधन केंद्रांतून मधमाशांची पोवळी प्रात्यक्षिकें करून दाखविण्यासाठी ठेवण्यांत येतात. कोईमतूर येथें एक सरकारी संशोधन केंद्र आहे. ह्या केंद्रांत ४० पोवळीं संशोधनासाठी ठेवण्यांत आलीं आहेत. प्रात्यक्षिक करून दाखविणाऱ्या नौकर वर्गावर १६,४०० रुपये खर्च होतात १९५०–५१ सालीं मद्रास राज्याच्या उत्तरेकडील जिल्ह्यांतून २,४४७ पोवळी होती आणि त्यांच्यापासून २८,९१७ पौंड मध उत्पन्न झाला. मद्रास राज्यांत दक्षिणेकडे आणि पश्चिमेकडील किनाऱ्यावर हा धंदा काढण्यास उत्तेजन देण्याचा मद्रास सरकारचा विचार आहे. १९५२–५३ सालीं धंद्याचा विस्तार करण्याचें काम सरकार हातीं घेईल असा अंदाज आहे. ग्रामीण जनतेच्या पेशाच्या उत्पन्नांत भर घालण्यासाठीं अशा थोड्या भांडवलाच्या धंद्यांचा चांगला उपयोग होतो. मात्र, उत्पादनाच्या विक्रीची व्यवस्था कार्यक्षम असणें आवश्यक असतें.

# बँकर्सची सहल : पूना बँकिंग असोसिएशनची योजना



**लोणावळ्याच्या मार्गावर**

जोग, पुरोहित, गांडेकर, ताम्हणे, साळवेकर, देशपांडे, क्षीरसागर, आपटे, सोनाळकर, साठे व काळे ( स. "अर्थ" )



**पेपर अँड पल्प कारखान्यांत**

फोटोंत मध्यभागीं कंपनीचे तज्ज्ञ जर्मन सल्लागार उभे असून इमारतीच्या कोपऱ्यासमोर मागील रांगेंत श्री. पारखे दिसत आहेत.

पुण्यांतील बँकांच्या कांहीं व्यवस्थापकांनीं रविवार ता. ६ व सोमवार ता. ७ ह्या दिवशीं खंडाळा—लोणावळा भागांत एक सहल काढली होती. न्यू सिटिझन बँकेचे श्री. गांडेकर ह्यांनीं सर्व बँकर्सकडे सहलीविषयीं माहितीपत्रक पाठविलें होतें व सर्वांना येण्याविषयीं विनंती केली होती. बारा बँक अधिकारी सहलींत सामील झाले होते, ते खालीलप्रमाणें:—

श्री. पुरोहित ( सेंट्रल बँक ऑफ इंडिया ), श्री. बोरा ( बांठिया बँक ), श्री. आपटे ( नॅशनल सेव्हिंग्ज बँक ), श्री. सोनाळकर ( युनायटेड कमर्शिअल बँक ), श्री. साळवेकर ( पूना इन्व्हेस्टर्स बँक ), श्री. साळवेकर व श्री. क्षीरसागर ( भारत इं. बँक ); श्री. साठे ( बँक ऑफ पूना ), श्री. ताम्हणे ( बँक ऑफ इंडिया ), श्री. गांडेकर ( न्यू सिटिझन बँक ), श्री. देशपांडे ( डेक्कन इन्व्हेस्टर्स बँक ), श्री. जोग ( बँक ऑफ महाराष्ट्र ).

### करमणूक आणि निरीक्षण

रविवारीं सकाळीं सर्वजण मोटारीनें निघाले. लोणावळा येथील वि. प्र. सभेच्या हायस्कूलमध्यें उतरण्याची उत्कृष्ट व्यवस्था करण्यांत आली होती. दुपारीं श्री. भाऊसाहेब साळवेकर ( पूना इन्व्हेस्टर्स बँक ) ह्यांच्या बंगल्यावर त्यांनीं सर्वांना आग्रहाचें जेवण घातलें. संध्याकाळीं वाघदरी, भोशी तलाव, एलफिन्स्टन पॉइंट, इत्यादि पाहिल्यावर रात्रीं भोजनोत्तर सर्वांची एक सभा झाली. बँकिंगची माहिती प्रसृत करण्यासाठीं व बँकिंगबद्दल लोकांत जागृति करण्यासाठीं काय प्रयत्न करता येतील, ह्याबद्दल सर्वांनीं आपले विचार मांडले, आणि "पूना बँकिंग असोसिएशन"च्या योजनेबद्दल तपशीलवार सूचना मागविण्याचें ठरलें. त्यानंतर दोन शैक्षणिक चित्रपट सर्वांना दाखविण्यांत आले. सोमवारीं सकाळीं खोपोली येथील पेपर अँड पल्प कंपनीचा नवा मोठा कारखाना मॅनेजिंग एजंट श्री. बाबूराव पारख ह्यांनीं मोठ्या आस्थेनें दाखविला आणि सर्वांना उपहार दिला. महड येथील गणपतीच्या दर्शनानंतर मोटार खोपोली वीजकेंद्राकडे नेण्यांत आली. दुपारच्या जेवणानंतर भारत इंडस्ट्रिअल बँकेच्या शाखा कचेरींत बँकेच्या मॅनेजिंग डायरेक्टर्सनीं सर्वांना फलाहार दिल्यावर मंडळी लकाकी कारखाना पाहून सायंकाळीं पुण्यास परतली.

### उपयुक्त कार्याची उत्साहपूर्वक आंखणी

बँकिंगच्या एकाच व्यवसायांत काम करणारे वेगवेगळे लोक खेळीमेळीनें एकत्र येऊन विचारविनिमय करीत असल्याचें दृश्य उत्साहकारक होतें. सर्वांनीं सृष्टिसौंदर्याचा लाभ तर घेतलाच; त्याबरोबरच एकमेकांच्या अकृत्रिम सहवासाचाहि त्यांना फायदा मिळाला. अशा उपक्रमांतूनच भरीव कामगिरीचा पाया घातला जाईल, अशी आशा निर्माण झाली आहे. व्यवसायाच्या वाढीकडे लक्ष देण्याचे बाबतींत सहकार्य करण्यास हे सर्वच जण उत्सुक आहेत. तज्ज्ञांचीं व्याख्यानें करविणें, बँक नोकरांच्या मार्गदर्शनासाठीं माहितीचे तक्ते, नकाशे वगैरे तयार करणें, गिऱ्हाइकांना बँकिंगच्या सोयींची व सवलतींची माहिती करून देणें, इत्यादिसाठीं योग्य व इष्ट तें काम करणें, हें सर्वांच्या हिताचें ध्येय पुढें ठेवण्यांत आलें आहे. "पूना बँकिंग असोसिएशन"चें ध्येय लवचिक परंतु व्यापक राहील व त्यांत कोणासहि निःसंकोचपणें भाग घेतां येईल, अशीच योजना करण्यांत येणार आहे.

"अर्थ"च्या संपादकांस ह्या सहलींत पाहुणे म्हणून भाग घेतां आला, ह्याबद्दल आनंद वाटतो. सहलीचे वेळीं श्री. जोग, श्री. पुराणिक व श्री. बोरा ह्यांनीं काढलेल्या फोटोंपैकीं श्री. बोरा ह्यांनीं काढलेले दोन फोटो वर दिले आहेत. त्यामुळें श्री. बोरा हे मात्र फोटोंत येऊं शकले नाहींत.

**पाकिस्तानांत साखरेचे कारखाने**— पाकिस्तान सरकार पंजाबांतील थळ आणि ल्यालपूर भागांत दोन साखरेचे कारखाने काढणार आहे, असें समजतें. त्याशिवाय भावलपूरमध्येंहि एक कारखाना काढण्याची परवानगी देण्यांत आली आहे. १९५०-५१ च्या हंगामांत पाकिस्तानांत ३४,५८८ टन साखर तयार झाली.

**पाकिस्तानला पोलादाचा पुरवठा**— रशिआकडून १,००,००० टन पोलाद घेण्याचा करार मॉस्को येथील आर्थिक परिषदेंत पाकिस्तान करणार आहे, असें समजतें.

**कारखाने वाढले, पण उत्पादन घटलें**—१९५०-५१ सालीं मुंबई राज्यांत कारखाने वाढले पण उत्पादन मात्र घटलें, असं समजतें. १९४९ सालीं राज्यांत ६,८३५ कारखाने होते. १९५० सालीं कारखान्यांची संख्या ७,०९७ इतकी झाली.

**मद्रासासाठीं तांदुळाची बचत**— मद्रास राज्यांत तांदुळाचा तुटवडा पडल्यामुळें उत्तर प्रदेश सरकारनें धान्याच्या वाटपांत बदल करून तांदूळ कमी देण्यास सुरवात केली आहे. अशी बचत करून सुमारें १५,००० टन तांदूळ मद्रासासाठीं मध्यवर्ती सरकारला देण्यांत येणार आहे.

## मंदींतील व्यापारी धोरण.

(श्री. ना. अ. तेंडोलकर, मॅनेजिंग डायरेक्टर, हिंद एजन्सीज लि. जयहिंद एजन्सीज, अॅडव्हान्स इंजिनियरिंग कं., वगैरे.)

"बरें झालें! सांठेबाज काळाबाजारवाला मेला. मला त्यांत दुःख नाहीं." मंदीच्या लाटेंत सांपडलेल्या व्यापारी कारखानदार-वर्गाबद्दल असे उद्गार सर्वसामान्य जनतेप्रमाणें आमच्या पुढाऱ्यांचे तोंडूनहि ऐकूं येतात. हे एक गोष्ट विसरतात. ती म्हणजे व्यापारी अगर कारखानदार हा राष्ट्रीय जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. शरीराच्या कोणत्याहि भागास इजा झाल्यास सर्व शरीरच जसें बेचैन होतें, त्याप्रमाणेंच या वर्गावर होणारे परिणाम सर्व राष्ट्रासच भोगावे लागतात. मंदी येतांच व्यापारी कमी खरेदी करूं लागतात. खर्चात काटकसर सुरू करतात यामुळें कारखानदारी गडगडते. कच्च्या मालास मागणी घटते. मजूर बेकार बनतात, सर्वच जनतेची खरेदीशक्ति कमी होते, राहणीचें मान घसरूं लागतें व अशाप्रकारें हें दुष्ट चक्र सुरू होतें.

प्रतिकूल पण कडक सरकारी धोरण (अगर धोरणाचा अभाव) व रोषमय जनता यांना खुष करणें व त्यांचें सहकार्य मिळविणें आज व्यापारीवर्गास दुरापास्त आहे; आणि म्हणून ही परिस्थिति सुधारण्याचा स्वतःच चंग बांधणें फार अवघड पण आवश्यक आहे. मुंबई स्टेट ट्रॅन्स्पोर्टसारख्या राष्ट्रीयकरणाच्या महागड्या व घाईच्या अनेक चटक्यांतून बाहेर पडल्यावरच जनतेस व नेत्यास काटकसरी, कार्यक्षम व सुखावह खाजगी व्यापारी-कारखानदारीचें महत्त्व पटलें तर पटेल. तोंपर्यंत आम्हांस सामुदायिकरित्या या बिकट अवस्थेंतून मार्ग काढला पाहिजे. आज व्यापारी व कारखानदारवर्गानें काय करावें? कोणतें धोरण आंखावें म्हणजे ते या परिस्थितींतून पार पडूं शकतील, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आतां याचा काळजीपूर्वक विचार व तात्काळ अंमलबजावणी झाली पाहिजे.

### ताकतीपेक्षां मोठा व्यापार—मंदीचें कारण

चालू मंदीचें, व्यापारी दृष्टिकोनांतून मुख्य कारण कोणतें असेल तर तें म्हणजे व्यापारी व कारखानदार या दोघांनाहि आपल्या ताकतीपेक्षां अधिक ओझें घेण्याची म्हणजे कुवतीपेक्षां जास्त व्यापार-उत्पादन करण्याची युद्धकाळांत लागलेली गोडी, हें होय. जोपर्यंत मालाची टंचाई होती तोंपर्यंत किंमती टिकून राहिल्यानें अगर त्या सतत वाढत गेल्यानें थोड्या भांडवलावर पुष्कळच व्यापार व मक्तेदारी करणें शक्य होत गेलें. बँका व इतर भांडवलानें त्यांस साथ दिली. परंतु माल उपलब्ध होतांच व तो सर्व कराराप्रमाणें उचलण्याची पाळी येतांच त्यांना तो उचलणें अशक्य झालें. ते आपली अब्रू व थोडेंफार नुकसान वांचविण्यासाठी कमी किंमतीनें तो माल विकण्याची घाई करूं लागले. किंमतींत घट होऊं लागली. यांतच बँका-सरकार-सेल्स टॅक्स-इनकमटॅक्स व भांडवलानें या वर्गाशीं असहकाराचें धोरण अंगिकारिलें. आपलीं येणीं बुडतील कीं काय म्हणून देणेकऱ्यांनीं तगादे सुरू केले, इत्यादींचा परिणाम म्हणजे चालू मंदी होय.

### किंमतीघट तात्कालिक

ही किंमत घट एकदम आली, असें नाहीं. ती ऑक्टोबर, ५१ पासून थोड्याफार प्रमाणांत दिसूं लागली व ती वाढत जाऊन तिची परिणती फेब्रुवारी १९५२ अखेर झाली. कारण, या काळांत व्यापाऱ्यांनीं परिस्थिति सांवरण्याचे प्रयत्न केले. शक्यती नुकसानी सोसली. पण ती पेलत नाहीं असें होतांच तिला थोडें उग्र स्वरूप प्राप्त झालें. ही किंमतघट सर्वत्र सारखी नाहीं. कच्च्या मालाच्या भावांत ती २५ ते ५० टक्के आढळते, तर पक्क्या मालांत १० ते २० टक्केच आढळते. तसेंच ती सर्वच व्यापारास लागू नाहीं. कारण, आजाहि सिमेंट, लोखंड, खतें, चहा, जळणाचीं तेलें, रसायनें वगैरे अनेक वस्तूंत ती आढळत नाहीं. उलट हें मार्केट तेजींत आढळतें. म्हणजे, बाजारांत घाबरण्यासारखी परिस्थिति आहे, असें नाहीं.

उन्हाळ्यामागून पावसाळा, या सृष्टिनियमानुसारच कोणतीहि मंदी अगर तेजी टिकूं शकत नाहीं. म्हणून व्यापारी-कारखानदार-वर्गानें धीर न सोडतां थोडे दमानें घेतल्यास त्याहि परिस्थितींतून पार पडतां येईल.

अर्थात, मंदीच्या काळांत व्यापारी कारखानदारवर्गाचें खरें भांडवल कोणतें असेल तर तीं त्यांची शिल्लक हें नसून त्यांचा दमदारपणा हें होय. त्यांनीं धीर सोडून घबराट माजवूं नये, तर शांत होवयानें व विचारीपणानें वागले पाहिजे. घाबरल्यानें नुकसानी टळते असें नाहीं, तर त्यांतुन मार्ग काढण्यानेंच ती टळणार आहे.

### कर्जमुक्त व्हा

व्यापाऱ्यांनीं मंदी सुरू होतांच हातीं असलेला माल विक्री करून जी रक्कम येईल ती पुन: व्यापारांत न गुंतवितां तिचा उपयोग लोकांचीं देणीं भागविणें व कर्जमुक्त होणें याकडे करावा.

यानंतर दुसरी दक्षता घ्यावयाची असेल तर ती म्हणजे स्वतःचे भांडवलावर धंदा करण्याची. इतकेंच नव्हे, तर त्यांनीं भांडवल हातीं राखून धंदा करणें आवश्यक आहे. दुसऱ्याच्या भांडवलावर अगर मदतीवर (बँका, वगैरे) विसंबून राहूं नये. कारण असें झालं तरच त्यांना देणेकऱ्यांचें भांडवली देण्यासाठी तगादे लागणार नाहींत अगर येईल त्या किंमतीस माल विकून अब्रू सांभाळण्याची पाळी येणार नाहीं. धंदा करून नुकसानी सोसण्यापेक्षा थोडा वेळ स्वस्थ राहणें हें धंद्याचे व स्वहिताचे दृष्टीनें शहाणपणाचें ठरते.

### कुवतीपेक्षा कमी व्यापार

कुवतीपेक्षां मोठा व्यापार हें व्यापारी नुकसान व दिवाळखोरींतील एक महत्त्वाचें कारण आढळतें. व्यापार हा आपल्या ताब्यांत न ठेवला तर तो आपलाच ताबा घेतो. म्हणून झेपेल त्यापेक्षां कमी व्यापार करणें, हे आपलें पहिलें कार्य ठरतें.

### धंदा केंद्रीभूत करा

युद्धकाळांत व तदनंतर प्रत्येकानें आपआपल्या ताकदानुसार धंद्याचे व्याप वाढविले आहेत. अनेक व्याप करून ते अकार्यक्षमरीत्या चालविण्यापेक्षां व पुष्कळ शाखा व धंदे यापेक्षां नेहमीच्या काळांत देखील कार्यक्षम थोडा धंदाहि किफायतशीर ठरतो. मंदीच्या काळांत तर धंदा जास्तीत जास्त केंद्रीभूत व कार्यक्षम असणें फारच आवश्यक असतें. अनेक मोठमोठी कंबाइन्स ही लहान धंद्यापेक्षां नेहमी किफायतशीर आढळून येत नाहींत. म्हणून, व्यवस्थित रीत्या चालवितां येईल येवढाच व हजारों प्रकारच्या व्यापापेक्षा कांहीं ठराविक व्यापारच फायदेशीर होईल, म्हणून व्यापाऱ्यांनीं आपल्या किफायतशीर लाइन्स कोणत्या, फायदा देणाऱ्या व तोट्यांत असणाऱ्या अगर कांठोकाठ चालणाऱ्या शाखा कोणत्या, यांचा विचार करून झटपट निर्णय घ्यावा व उत्कृष्ट सर्जन ज्याप्रमाणें अयोग्य मानवी भागाची छाटाछाट करतो त्याप्रमाणें व्यापाऱ्यांनीं किफायतशीर लाइन्स व शाखा ठेवणें व इतर सर्व निकालांत काढणें आवश्यक आहे.

### उधारी बंद करा

हिंदी व्यापारी वर्गावर जर कोणतें मोठें बांडगूळ माजलें असेल तर तें म्हणजे उधारीचें होय. उधारी किंवा पतीवर माल देण्याची वहिवाट ही सर्वच व्यापारी वर्गास मोठी तापदायक गोष्ट आहे. यामुळें व्यापारी वर्गास जसें नुकसान सोसावें लागतें तसेंच हातीं पैसा नसला तरी आपली चैन व्यवस्थित चालते असें आढळल्यानें चैनीस सोकावलेला एक बेजबाबदार वर्गहि निर्माण होतो. जोपर्यंत जनतेच्या हातीं भरपूर पैसा खेळतो तोपर्यंत बऱ्यांचशा प्रमाणांत ही उधारी वसूल होते. पण पैशाचा (आजच्याप्रमाणें) थोडाफार दुष्काळ पडतांच उधारी बुड प्रमाणांत जबरदस्त वाढ होते. व्यापार होतो म्हणून उधारी करणें व मूळ भांडवलहि गमावून बसणें, यासारखा दुसरा कोणताहि मूर्खपणा नसेल. मंदीच्या काळांत तर शंभर टक्के रोखीचा व्यवहार व उधारी वसुलीचे जोरदार व चिकाटीचे प्रयत्न यांची आवश्यकता आहे.

### कसोशीची खरेदी

व्यापाऱ्यांना मालविक्रींत होणारा नफा, हा त्यांचे मालखरेदींतील कसोशीवरच मुख्यतः अवलंबून असतो. त्यांतहि मंदीचा काळ येतांच प्रत्येक व्यापाऱ्यानें कशोशीच्या खरेदीवर विशेष भर देणें आवश्यक ठरतें. आपणांस आवश्यक तेवढाच, झटपट खपेल असाच माल खरेदी करण्याचें मंदीचे काळांत फार महत्त्व आहे. स्वस्त मिळतो म्हणून किंवा क्वचित प्रसंगीं खपतो म्हणून त्यांत रकमा गुंतविणें धोक्याचें आहे. प्रत्येक खरेदी करतांना हा माल किती दिवसांत खपवितां येईल हा पहिला प्रश्न त्यानें केला पाहिजे. तसेंच तो माल कांहीं ठराविक गिऱ्हाइकांनाच लागतो कीं सर्वसामान्य गिऱ्हाइकांनाहि लागतो याचाहि विचार केला पाहिजे तेव्हा ज्या मालास सर्वसामान्य गिऱ्हाईक आहे त्यांतच भांडवल गुंतविणें व थोडी गिऱ्हाइकें गमावलीं तरी त्याचें दुःख न मानणें हें अंतिम हिताचें ठरतें. माल हा शक्यतो त्या लाइनमधील स्टँडर्ड असा असावा.

### एकाच प्रकारचा धंदा किफायतशीर

तसेंच, अनेकप्रकारचा व्यापार करणें नेहमीच धोक्याचें ठरतें. स्टेशनरीविक्यानें मशिनरी स्टोअर्स ठेवणें हें कधींहि शहाणपणाचें व हिताचें होत नाहीं, तर आपला गिऱ्हाइकांचा जो वर्ग असेल किंवा आपणांकडे जें गिऱ्हाइक असेल तेंच गिऱ्हाइक त्या प्रकारचा आणखी कोणकोणता माल घेईल याचा विचार करून (उदा० सुयाखरेदी करणारी बाई दोरा घेईल, रेशीम लोकर खरेदी करील, स्नोपोमेड घेईल, वगैरे) तो माल ठेवणें व त्यावरच मुख्य भर देणें आवश्यक व किफायतशीर आहे. युद्धकाळांत स्टेशनर्स आपले दुकानांतून रॉकेल विकीत, तर भांडिविके आपले दुकानांत टायर ट्यूब्ज ठेवित, इत्यादि. पण ही परिस्थिती यापुढें तशीच राहणार नाहीं व असें करणाऱ्यांना पश्चात्तापाचीच पाळी येईल. म्हणून प्रत्येकानें आपल्या स्टॉकचा आढावा घेऊन आपल्या लाइन्स कोणत्या व इतर आगांतुक माल कोणता याचा विचार करून आपल्या लाइन्सवर भर देणें व इतर माल काढून टाकणें शहाणपणाचें ठरेल. तसेंच, सर्वच मालांत व्यापार करण्यापेक्षां आपल्या कांहीं "स्पेशॅलिटी" निर्माण करणें त्यांच्या हिताचें होईल.

### खर्चांत काटकसर

आपलें उत्पन्न कोणकोणत्या बाबींमुळें घटतें याचाहि त्यांनीं विचार करून त्यांना तावडतोब काट देणें जरूर आहे. यासाठीं त्यांनीं धंद्यासंबंधीं अधिक बारकाईनें व काटेकोरपणें विचार करणेस शिकलें पाहिजे. मालाची चोरी–नोकर लोकांची उधळखोरी–स्टेशनरी, तारा, टेलिफोन, पोस्टेज–चहापाणी व किरकोळखर्च–फुटतुट–नासाडी–रेल्वे डीमरेजीस, म्यु ऑक्ट्रॉय–इतर कर–बँक चार्जिस–प्रवास भत्ते–नोकरखर्च, वगैरे सर्वांचाच त्यानें बारकाईनें विचार करण्यास शिकलें पाहिजे व शक्य तेथें विधायकरीत्या काटकसर केली पाहिजे. कारण, खर्चांत काटकसर म्हणजे मिळकतींत वाढ, ही जनी म्हणच आहे. म्हणून, प्रत्येक व्यापाऱ्यानें आपल्या सर्वांगांचा व खर्चाचा त्रयस्थाच्या दृष्टिकोनांतून विचार केला पाहिजे. अनुभवी तज्ज्ञांचा सल्ला घेणेंहि हितावह ठरेल.

मुख्य म्हणजे, मंदीच्या काळांत अधिक विचार व चिकाटी व जादा मेहनत यांची फारच आवश्यकता असते. निरुत्साही न होतां अगर धीर न सोडतां जो कोणी या परिस्थितीवर मात करण्याचा प्रयत्न करील, तोच यांतून पार पडेल.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)

शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.

दरमहा १ रु. पासून १०० रुपयांपर्यंत हप्त्याची बचत योजना. व्याज ३ ते ३½ टक्के.

हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

## सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास

नाशिक जिल्ह्यासाठी सर्व सहकारी सोसायटयांचे सेक्रेटरीचा ट्रेनिंग क्लास, घोटी ता. इगतपुरी येथें ता. २१–४–१९५२ ते १५–६–१९५२ अखेर मुदतीचा घ्यावयाचा आहे. ज्या उमेदवारांस सहकारी शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनीं खालील सही करणार यांजकडे ता. २०–४–१९५२ चे आंत अर्ज करावेत. अर्जासोबत क्लास फी रु. ३ लगत पाठवावी. उमेदवाराचें शिक्षण निदान व्ह. फा. पास झालेला अगर सहकारी संस्थेंत काम करीत असला पाहिजे. उमेदवारास सदर शिक्षण स्वखर्चानें घ्यावें लागेल. क्लास फी भरल्यानंतर कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाहीं. क्लासानंतर परीक्षेंत यशस्वी उमेदवारांना सेक्रेटरी म्हणून नेमण्याची व्यवस्था करण्यांत येईल. उमेदवारांनीं, घोटी (इगतपुरी) येथें, इगतपुरी तालुका खरेदी–विक्री संघाचे ऑफिसांत समक्ष ता. २१–४–१९५२ रोजीं ११ वाजतां बिनचूक हजर व्हावें.

एन. वाय. कुळकर्णी,
को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर
(घर नं. २१७८, मधली होळी) नाशिक.

पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

## सभासदांस विनंती

"पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि. ची सहामाही चर्चात्मक सभा रविवार दि. २०–४–५२ रोजीं सायंकाळीं पांच वाजतां बँकेच्या मुख्य दिवाणखान्यांत (बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें शहर) भरणार आहे. तरी सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनीं अवश्य यावें अशी विनंती आहे."

पुणें शहर
दि. ७–४–५२

बोर्डाच्या हुकुमावरून
(सही) मो. वि. रबडे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## भुईमुगाच्या शेंगदाण्याचें पीठ

(श्री. मा. वि. घारपुरे, क्युरेटर, लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें)

मी साडेबारा शेर भुईमुगाचे चांगले दाणे विकत घेतले याला रु. ८ किंमत पडली. हे दाणे मडीवर मडकुंड्याच्या कढईत वाळूंत साल सुटण्यापुरते थोडे भाजले. या भाजणावळीस रु. १ खर्च आला. दाणे कच्चे ठेविले; फार भाजल्यास लाल डाग पडेपर्यंत भाजलेल्या दाण्यांचे घाण्यांत तेल निघत नाहीं व निघतें तें फार थोडें निघतें. म्हणून दाणे कच्चे भाजणें जरूर आहे. हे दाणे चोळून त्यांचे सर्व फोल काढले व नंतर धान्य निवडतात त्याप्रमाणें ते निवडून कुजके दाणे, खडे, इत्यादि गदळ काढून ते निर्मळ केले. भाजण्यांत व गदळ काढण्यांत दाण्यांचें वजन एक शेर कमी झालें. नंतर हे ११॥ शेर दाणे शेती-कॉलेजवरील व्हिलेज इंडस्ट्रीज डिपार्टमेंटमध्यें "हस्केल" बैलघाण्यावर तेल काढावयास पाठविले. या दाण्यांपासून एक चौकोनी डालडाचा जुना १० पौंडी डबाभर तेल मिळालें व सुमारें ५ शेर वजनाची दाण्याची पेंड मिळाली. दाणे अगदीं स्वच्छ पांढरे, बिनडाग असल्यामुळें तेल डालडासारखें स्वच्छ व तुपासारखें खमंग व चवदार मिळालें व दाण्याची भुकटीहि पांढरी स्वच्छ व निर्मळ मिळाली. आपण प्रत्यहींच्या व्यवहारांत घरीदारीं जी मेहनत करतों त्याप्रमाणें या मेहनतीचे पैसे किंवा मजुरी या प्रयोगांत मोजली नाहीं. ठोकळ मानानें इतकें स्वच्छ खाण्याचें साजुक तेल डालडा व बाजारांत मिळणारें शेंगदाण्याचें तेल यांच्या भावाचा विचार करून या डबाभर तेलाची किंमत रु. १० धरली व मग दाण्याची पेंड फुकट पडली.

अशा प्रकारें मिळालेलें हें पूरक अन्न दाण्यांचेपेक्षां अधिक पौष्टिक व मोठें उपकारक आहे असें शास्त्रज्ञांचें मत आहे. यांत ही दाण्यांची भुकटी मधुमेह असलेल्या माणसांना "अन्न" म्हणून चांगली ठरलेली आहे. याच्या अन्न म्हणून सेवनानें लघवींत साखर येत नाहीं. दाण्याच्या पेंडीचें तिच्या पाण्यांत पडलेल्या वळणाच्या उलट ती मोडून बारीक तुकडे हातानें करितां येतात व हे तुकडे वाळवून, कुटून किंवा दळून त्याचें उत्तम पीठ तयार होतें. लहान लहान तुकडे पाण्यांत ५।६ तास भिजत घातले असतांना दहीं, पीठ, मिरची घालून त्याचें डांगर किंवा तोंडीलावणें किंवा स्वतंत्र खाणें तयार होतें. या पिठाचा उपयोग बाजरीची भाकरी, जोंधळ्याची भाकरी किंवा गव्हाची पोळी यांच्या पिठांत भरतीसाठी केल्यास त्यामुळें हे तीनहि जिन्नस चवदार होतात. सबंध दाणे त्यांत तेल असल्यामुळें जास्ती खाल्ले असतांना बाधतात. परंतु या पिठांत तेलाचा अंश फार कमी असल्यामुळें हें पीठ बाधत नाहीं. यांत तेल, दाणे, पीठ, हे सर्व जिन्नस उपवासाच्या आहारासाठींहि शुद्ध आहेत. या बाबतींत प्रयोग पूर्वी झालेले आहेत. यांत अपूर्व किंवा नवीन शोध मी लाविलेला नाहीं. परंतु असा अल्पमोली बहुगुणी पदार्थ पेंड म्हटली कीं ती गुरांनीं खावी या रूढीमुळें लोक या पदार्थाची मनांत तेढ धरून अवहेलना करितात. परंतु ही गोष्ट बरोबर नाहीं. हेंच तेल व हीच दाण्याची पेंड कोणास काढून हवी असेल तर त्यांना तेल व दाण्याची भुकटी तयार करून देण्याची व्यवस्था होईल. या प्रयोगांतील सर्व नमुने व माहिती म्युझिअममध्यें मांडण्यांत आली आहे.


### ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वीं आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

### दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

### पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

**संस्थेकडे खालीलसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.**

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें; ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या वियमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.